# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६

## (दुपारी १२-०० ते १२-४५ वाजता)

**(क) : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६, शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६, सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ व मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन (अनुक्रमांक १):-**

**(१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर मराठी भाषा मंत्री निवेदन करतील :-**

केंद्र सरकारने मराठी भाषेला दिलेला "अभिजात दर्जा" कागदावर असल्याबाबत.

**(मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने (अनुक्रमांक २ व ३):-**

**(२) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १२ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मुंबईतील रस्ते आणि पदपथ अनधिकृत फेरीवाल्यांपासून मुक्त करण्याची मोहीम राबविताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सीताराम जाधव मार्ग, गणपतराव कदम मार्गावरील परवानाधारक स्टॉलवर देखील बेकायदेशीरपणे केलेल्या कारवाईबाबत.

**(३) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १६ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

नागपूर मधील दिक्षाभूमीचा विकास करून सौंदर्यीकरण करण्याबाबत.

**(ख) : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

**(सोमवार, ९ मार्च, २०२६ व मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) —**

**सर्वश्री विक्रांत पाटील,** प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"पनवेल क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पुनर्विकास तसेच विविध विकास प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टी धारकांच्या निवाऱ्यासाठी MMRDA रेंटल हाऊसिंग योजनेतील घरे मिळण्याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून नगरविकास विभागाकडे दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी मागणी करण्यात आलेली असणे, बालाजी सिम्फोनी (सुकापूर), मॅरेथॉन (पळस्पे) या रेंटल प्रकल्पातील शासकीय कोट्यातील ७८९१ घरे तसेच रोहिंजन येथील अधिराज, सुप्रीम-५ व ब्यु सर्कल या रेंटल हाऊसिंग प्रकल्पातील शासकीय कोट्यातील ३२१- घरे अशी एकूण १११०९ घरांची संख्या असणे, MMRDA कडून सदरची घरे गिरणी कामगारांसाठी देणे प्रस्तावित असल्याचे सांगण्यात येणे, परंतु गेल्या ८ वर्षात प्रत्यक्षात कोणतीही प्रक्रिया पूर्ण केलेली नसणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना ५०% घरे देण्याच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदरची ५०% घरे शासनाकडून पनवेल महानगरपालिकेला देणे, पनवेल महानगरपालिकेकडून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत झोपडपट्टी-पुनर्वसनाच्या कामासाठी सिडकोकडे पूर्वाश्रमीच्या-ग्रामपंचायत कळंबोली हद्दीतील सर्व्हे क्र.५३ या भूखंडाची मागणी केलेली असणे, भूखंडाचा वापर हा झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता करण्याचा पनवेल महानगरपालिकेचा चांगला हेतू असणे, या भूखंडावरती त्यावेळी PMAY प्रकल्प मंजूर झालेला असणे, सिडकोकडून या प्रकल्पासाठी सर्व्हे नं. ३३ ही जागा प्रस्तावित केलेली असणे, सदर भूखंडाकरिता रुपये ३१ कोटी २३ लक्ष ३३ हजार ८८२ एवढी रक्कम दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजी पनवेल महानगरपालिकेकडून भरणा करून घेतलेली असणे, सिडकोने सर्व्हे नं.५९ हा भूखंड पनवेल महानगरपालिकेला देण्याचे कबूल करणे, परंतु सन २०२३ पासून १४ वेळा पत्रव्यवहार करूनही भूखंडाची पूर्तता अजूनही केलेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) उच्च व तंत्रशिक्षण : (क)** "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठाचे सन २०२४-२०२५ वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ ते सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **दिव्यांग कल्याण मंत्री** : "महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २३ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

राजापूर नगरपरिषदेला विविध प्रलंबित विकास कामांसाठी तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी १५० कोटी रुपये विशेष अनुदान मंजूर करण्याबाबत.

(२) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २० वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील सरकारी आणि खासगी मिळून तब्बल १२,५६० शाळांना मैदान नसल्याबाबत.

(३) **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २४ वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

ठाणे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची जमीन अधिग्रहण केल्याप्रकरणी संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करुन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्याबाबत.

(४) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २१ वर कृषी मंत्री निवेदन करतील :-**

अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या १३ महिन्यांत ११५ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, वाढता कर्जबाजारीपणा आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी वर्गामध्ये निर्माण झालेली हतबलता.

(५) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २२ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री निवेदन करतील :-**

तळेगाव चाकण रोड ते श्रीक्षेत्र देहूगाव व तळेगाव चाकण रोड खालुम्ब्रे ते सावरदरी या रस्त्यांची कामे अद्याप रखडलेली असल्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील १,३५० मेगावॅट क्षमतेचा महत्त्वाकांक्षी औष्णिक वीज प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी माहे जानेवारी, २०२६ मध्ये 'एनटीपीसी लिमिटेड' आणि 'महाजेनको' यांच्यात भागधारक करार झालेला असणे, सदर प्रकल्प हा मूळचा इंडियाबुल्स पॉवर कंपनीचा असून आर्थिक दिवाळखोरीमुळे तो दीर्घकाळ प्रलंबित राहिलेला असणे, या प्रकल्पाच्या अधिग्रहणासाठी महाजेनको कन्सोर्टियमने सर्वाधिक बोली लावून राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (NCLT) या समाधान योजनेला मंजुरी दिलेली असूनही १५०० एकर पैकी सुमारे ५० एकर जमिनीशी संबंधित तांत्रिक अडथळे अद्याप दूर झालेले नसणे, राज्याची वाढती वीज मागणी पूर्ण करण्यासाठी २७० मेगावॅट क्षमतेचे ५ युनिट तातडीने सुरू होणे आवश्यक असताना सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल, प्रकल्पाची एकूण खर्चाची तरतूद, प्रत्यक्ष वीज उत्पादनाचा अपेक्षित कालावधी याबाबत प्रशासकीय पातळीवर स्पष्टता नसणे, या प्रकल्पामुळे सिन्नर परिसरात पायाभूत सुविधा आणि आर्थिक उलाढालीत मोठी वाढ होण्याची अपेक्षा असतानाही, जमिनीच्या तांत्रिक अडचणींमुळे हजारो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार संधींपासून स्थानिक तरुण अद्याप वंचित असणे, तरी शासनाने १५०० एकर जमिनीचा ताबा घेण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी निश्चित कालबद्ध कार्यक्रम (Timeline) जाहीर

करावा आणि उत्तर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी सदर औष्णिक प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.संजय केणेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"छत्रपती संभाजीनगर शहराच्या नवीन विकास आराखडयानुसार सर्व प्राचीन मंदिरे बाधित होत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये उघडकीस येणे, विकासाच्या नावाखाली प्राचीन मंदिरे पाडण्याचा महानगरपालिकेचा असलेला डाव, प्राचीन मंदिरे पाडण्यात येत असल्याने हिंदू बांधवांच्या भावना दुखावल्या जात असून याचे पडसाद तीव्र होण्याची निर्माण झालेली भिती, नवीन विकास आराखडयाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा पावित्रा हिंदू समाजाने घेणे याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू नवीन विकास आराखड्याबाबत फेरविचार करण्याची नितांत आवश्यकता, याबाबतची शासन दरबारी दखल न घेणे, यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेऊन नवीन विकास आराखडा (डी.पी.) बाबत बाधित प्राचीन मंदिरे वगळण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यातील पनवेल, खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, करंजाडे, नवी मुंबई या शहरांमध्ये लाखोंच्या संख्येने कामगार वर्ग असणे, "कामगार (ESIC) हॉस्पिटल" नसल्याने लाखो कामगारांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागणे, रायगड, नवी मुंबई तसेच रत्नागिरी जिल्ह्यात अनेक मोठया प्रमाणात MIDC क्षेत्र असून या दोन्ही जिल्ह्यात एकही कामगार रुग्णालय नसणे, आरोग्याच्या सोयीसुविधांविषयी कामगारांना सहन करावा लागणारा संघर्ष यामुळे कामगारांच्या दुखावलेल्या भावना, कामगारांची आरोग्यविषयक सोयी-सुविधांबाबत होणारी गैरसोय दूर करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील तळोजा MIDC अथवा शिरढोण तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील लगत इतर ठिकाणी "कामगार (ESIC) हॉस्पिटल" स्थापन करण्याची मोठ्या प्रमाणात होत असलेली मागणी, ESIC विभाग यासाठी सकारात्मक असून या हॉस्पिटल करिता आवश्यक असलेली शासकीय जागा उपलब्ध करण्याचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे प्रलंबित असून कामगारांच्या उज्वल भविष्यासाठी व आरोग्याच्या समस्या वेळेत सोडविण्यासाठी पनवेल येथे लवकरात लवकर कामगार हॉस्पिटल सुरू व्हावे म्हणून आवश्यक

असलेला सदरचा भूखंड त्वरित उपलब्ध करून देण्यासाठी लाखो कामगारांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री मिलिंद नार्वेकर, अभिजीत वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वन विभागातील लोहारडोंगरी येथील लोहखनिज खाणीला राज्याच्या वन्यजीव मंडळाने नुकतीच दिलेली मंजुरी, वाघांच्या भ्रमणाच्या कॉरिडॉरमध्ये असलेल्या या महत्त्वाच्या वन प्रदेशात 'ओपन कास्ट' खाण सुरू करण्याच्या प्रस्तावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असणे, येथील सुमारे ३५.९४ हेक्टर राखीव वनजमीन खाणीसाठी दिली जाणार असणे, या खाणीतून १२ वर्षांत दरवर्षी सुमारे ११ लाख टन धातू उत्पादन अपेक्षित असणे, खाणीचा हा परिसर घोडाझरी वन्यजीव अभयारण्याजवळ असून वाघांचा महत्वाचा कॉरिडॉर असणे, ब्रह्मपुरीच्या परिसरात सुमारे ६० वाघांचा अधिवास असणे, या ठिकाणच्या खाणीमुळे वाघांच्या अधिवासास धोका निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, एकीकडे राज्यात व देशात वन्यजीवांचे संवर्धन करण्यासाठी शासन हजारो कोटी रूपयांचा चुराडा करून नाविन्यपुर्ण योजना राबवित असताना दुसरीकडे त्याच जंगलातील खनिज संपत्ती काढण्यासाठी शासनाकडून दिली जाणारी परवानगी ही सर्वसामान्य जनतेसाठी अनाकलनीय बाब असणे, त्यामुळे सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजीची भावना, यास्तव चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वन विभागातील लोहारडोंगरी येथील लोहखनिज खाणीला राज्याच्या वन्यजीव मंडळाने दिलेल्या परवानगीस तातडीने स्थगिती देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सन १९५० नंतर राज्यात अनेक खाजगी संस्थांमार्फत प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा सुरु केल्या असून राज्यात १४००० खाजगी अनुदानित शाळा असणे, सदर शाळेकरिता शिक्षकांच्या वेतनासाठी अनुदान दिले जात असून वेतनेत्तर अनुदान फक्त ५ टक्के दिले जात असणे, सदर अनुदानात १ टक्के इमारत भाड्याची तरतूद असणे, उर्वरित ४ टक्के मध्ये स्टेशनरी, विज्ञान साहित्य, ऑडीट इत्यादीसाठी खर्च करावा लागत असणे, सदर ५ टक्के रक्कमेतून उपरोक्त खर्च भागत नसणे, शाळेत ग्रामीण भागातील गोरगरीब, कामगार, शेतकरी यांची मुले/मुली शिक्षण घेत असणे, संस्था मालकीच्या बहुतांशी इमारती ह्या जीर्ण झाल्या असल्याने शैक्षणिक संस्थापुढे अडचणी येत असणे, वेतनेत्तर अनुदान फारच कमी असल्याने त्या रक्कमेतून इमारती बांधणे शक्य नसणे, जुन्या

इमारती पाडून नवीन इमारती बांधणेसाठी संस्थांकडे निधीची कमतरता असणे, शाळांच्या जीर्ण झालेल्या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन इमारती बांधणेसाठी शासनाने ५० टक्के बिनव्याजी कर्ज व ५० टक्के अनुदान देणे तसेच ज्या शाळा भाड्याच्या इमारतीत आहेत त्यांचे १०० टक्के भाडे शासनाने अनुदानापोटी द्यावे, अशी शिक्षण संस्था महामंडळाची मागणी असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, राजेश राठोड, डॉ. परिणय फुके, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशातील व राज्यातील कामगार कायद्यानुसार झोमेटो, स्वीगी, ब्लिंकीट या कंपन्यामध्ये काम करणा-या गिग वर्करला कामगार समजले जात नसल्याने या गिग कामगारांचा कोणी नियोक्ता नसणे, वेतनाची, सेवेची, सामाजिक सुरक्षेची याला कोणतीही शास्वती नसणे, कामावर ठेवले किंवा काढून टाकले व कितीही मोबदला दिला तरी त्यात दाद मागता येत नसणे किंवा फिर्याद करता येत नसणे, असे लाखो असुरक्षित कामगार वेगवेगळ्या ॲपच्या आधारावर कार्यरत असल्याचे निदर्शनास येणे, देशात या कामगारांची संख्या १.२७ लाखांच्या वर असून आपल्या राज्यात २० लाखापेक्षा अधिक कामगार या व्यवस्थेत काम करीत असणे, या गिग कामगारांना वेतन सुरक्षा सेवा, सामाजिक सुरक्षा, जिवित हानी सुरक्षा व त्यांना कामाचा योग्य मोबदला मिळण्याकरिता अन्य देशातल्या व आपल्या देशातल्या तेलंगणा व झारखंड या राज्यातल्या मंजूर केलेल्या विधेयकाप्रमाणे एक विधेयक करणे गरजेचे असणे, त्या माध्यमातून या सर्व गिग कामगारांना मनमानी एकतर्फी अपारदर्शक आणि असमान, अटी व शर्ती पासून संरक्षण मिळेल, वेतनाच्या योग्य दराद्वारे आर्थिक शोषण कमी होईल, तसेच वृध्दापकाळ, अपघात, आजारपणासाठी सामाजिक सुरक्षा विमा आणि कल्याणकारी योजना होईल अशा पध्दतीच्या उपाययोजना करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस मंत्र्यांचे उत्तर.**

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

(१) **डॉ. परिणय फुके,** ॲड. निरंजन डावखरे, श्री. प्रविण दरेकर, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"महाराष्ट्र राज्यातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या धान उत्पादक जिल्ह्यांमध्ये शासकीय धान खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांना प्रचंड तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागणे, धानाचा आधारभूत दर साधारण रुपये २,३०० ते रुपये २,४०० प्रति क्विंटल निश्चित असूनही बोनसची थकीत रक्कम, नियमित चुकारे मिळण्यास विलंब होणे, शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडणे, खरेदी केंद्रांवर शासनाने दिलेला कोटा किंवा लिमिट संपल्याने शेतकऱ्यांना नोंदणी करूनही आपले धान विकता येत नसणे, केंद्राबाहेर ट्रॅक्टर/बैलगाडी घेऊन शेतकरी उभा राहणे, शासकीय खरेदी केंद्रांवर वेळेवर बारदाना उपलब्ध नसणे आणि १७ टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रतेचे कारण देऊन धान नाकारले जात असल्याने शेतकऱ्यांची मोठी लूट होत असणे; साठवणुकीसाठी गोदामांची पुरेशी क्षमता नसल्याने कोट्यवधी रुपयांचे धान उघड्यावर पडून पावसाने खराब होण्याची भीती निर्माण झाली असणे, याउलट छत्तीसगड राज्यामध्ये ७२ तासांत पेमेंट देणारे 'किसान पोर्टल' आणि तेलंगणामध्ये महिला बचत गटांमार्फत राबवली जाणारी आदर्श खरेदी प्रक्रिया महाराष्ट्रात कार्यान्वित करण्याची गरज असणे, व्यापाऱ्यांच्या घुसखोरीमुळे खऱ्या सातबाराधारक शेतकऱ्यांना टोकन मिळणे कठीण झाले असणे, ई-पीक पाहणीतील त्रुटींमुळे शेतकरी बोनस पासून वंचित राहणे, शासनाने या गंभीर प्रश्नी तातडीने लक्ष देऊन छत्तीसगड मॉडेलप्रमाणे खरेदीनंतर ४८ तासांत किमान ८० टक्के चुकारे थेट बँक खात्यात जमा करणे, प्रत्येक ५ ते १० गावांच्या समुहासाठी विकेंद्रित गोदामे उभारणे, मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी डिजिटल आर्द्रता मापक यंत्रांचा वापर अनिवार्य करणे आणि संपूर्ण खरेदी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना."

(२) **सर्वश्री इद्रिस नायकवडी,** अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्य शासनाच्या आरोग्य विषयक योजनेअंतर्गत श्रवणदोषग्रस्त लहान मुलांना सर्वसाधारण प्रवाहात आणण्यासाठी कॉकलीअर शस्त्रक्रिया (श्रवणशक्तीशी संबंधित वैद्यकीय प्रक्रिया) करावी लागत असणे, त्यासाठी राज्य शासनाकडून रुपये २ लाख इतकी मदत मिळत असणे, शासनाने त्यासाठी २ वर्षे इतकी वयोमर्यादा घातलेली असणे, परंतु रुपये २ लाखांची मदत अत्यंत कमी असणे, वास्तविकत: या शस्त्रक्रियेसाठी अंदाजे ६ ते ७ लाख रुपये खर्च येत असणे, तसेच त्यावरील उपचाराची दिशा ठरविण्यासाठी ३.५ वर्षे इतका

कालावधी लागत असणे, अल्पवयोमर्यादेमुळे जवळपास १२०० बालके प्रतिक्षेत असून त्यांचेसाठी विशेष निधी (Special Provision) उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता असणे, महाराष्ट्राखेरीज इतर राज्यात या शस्त्रक्रियेसाठी शासनाकडून रुपये ६ लाख मदत मिळत असणे व ३.५ वर्षांचा कालावधी गृहीत धरण्यांत आलेला असणे, राज्य शासनाने सदर कॉकलीअर इम्प्लॉन्ट (Cochlear Implant Surgery) ५ वर्षांपर्यत वाढविण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास दिनांक ३० जुलै, २०२२ व २५ जुलै, २०२३ अन्वये सादर केलेला असणे, परंतु त्याबाबत अद्याप केंद्र शासनाकडून प्रतिसाद आलेला दिसत नसणे, त्याचबरोबर श्रवणदोष मुक्त बालकाची वयोमर्यादा ५ वर्षे आणि खर्च मर्यादा रुपये ७ लाखांपर्यंतची बाब शासनस्तरावर अद्यापही विचारार्थ असल्याचे निदर्शनास आले असणे, परिणामी याप्रकरणी शासनाने तातडीने विशेष धोरणात्मक कार्यवाही करण्याची व त्याअनुषंगाने उपाययोजना करण्याची आवश्यकता."

**आठ : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

नऊ : (क) **(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६, सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ व मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील नगरपालिका, महानगरपालिकेचा कारभार प्रशासनामार्फत गेले अनेक वर्ष चालविल्यामुळे वाढलेला गैरव्यवहार व नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत ८१ हजार ४४९ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी मोडून त्यापैकी ३६ हजार ६२३ कोटी रुपये विविध प्रकल्पांसाठी वापरण्यांचे निश्चित केल्याने त्यामध्ये झालेली अनियमितता, मुंबईची सर्वसामान्यांची लाईफलाईन असलेली बेस्ट बंद करण्याचा डाव असणे, विविध मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार, एमएमआरडीए तसेच सिडको या प्राधिकरणांमध्ये वाढलेला गैरव्यवहार, त्यामुळे त्यांची ढासळलेली आर्थिक स्थिती, विविध शहरांचे विकास आराखडे व हद्दवाढीचे प्रस्ताव रखडणे, मिठी नदी स्वच्छता व गाळ काढणे या निविदेत झालेली अनियमितता, तसेच नागपूर महानगरपालिकेत कंपोस्ट डेपो, रिंग रेल्वे, डम्पिंग यार्ड, इत्यादी कामात झालेली

अनियमितता, एसटीपी प्रकल्प नसल्याने पाणी निचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, मोठया प्रमाणात उड्डाण पूल तयार होऊनही वाहतूक कोंडी निर्माण होणे, तसेच निधी अभावी दुरुस्तीची कामे रखडलेली असणे, गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी न होणे, एसआरए अंतर्गत झालेला भ्रष्टाचार, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे धोरण निश्चित करणे, म्हाडाच्या लॉटरीमध्ये झालेला गैरव्यवहार, गिरणी माथाडी व सफाई कामगार व पोलीस कर्मचारी यांना हक्काची घरे प्राप्त न होणे, केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपडपट्टी व इमारतीबाबत धोरण ठरविणे, सार्वजनिक बांधकाम अंतर्गत राज्य महामार्ग व इतर रस्त्यांची तसेच अन्य कामे निधी अभावी रखडली असून ठेकेदारांना पुरेसा व वेळेवर निधी मिळत नसल्याने रस्त्याचा दर्जा निकृष्ट असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

**(ख) (मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, अ‍ॅड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, चंद्रकांत रघुवंशी, डॉ. परिणय फुके, सर्वश्री इद्रिस नायकवडी, अमरिशभाई पटेल, पंकज भुजबळ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, विक्रांत पाटील, दादाराव केचे, संदीप जोशी, योगेश टिळेकर, संजय केणेकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"दावोस मध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व तत्कालीन उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावरहाऊस' झाले असणे, १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख

होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करण्यात येणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात आला असणे, "माझी वसुंधरा अभियान" राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकीय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमत्तेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याकरिता आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

**(१) डॉ. परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळांची स्थापना करण्यात आली असणे, मात्र सन २०१० पासून ८५ टक्के कर्जदारांची सुमारे ८०० कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्याने या महामंडळास आर्थिक चक्र पूर्णपणे कोलमडले असून महामंडळे आर्थिकदृष्टया दुर्बल झाली असणे, तसेच वसुलीसाठी स्थापन केलेल्या प्रादेशिक वॉर रूम आणि संगणकीकृत मॉनिटरिंग प्रणालीचा परिणाम दिसून येत नसणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वसुलीची गती मंदावली असणे, यामुळे नवीन पात्र लाभार्थ्यांसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यास महामंडळे असमर्थ ठरत असून मागासवर्गीय युवकांच्या रोजगाराचा प्रश्न अधिक गंभीर झाला असणे, शासनाला पुन्हा ५७० कोटी रुपयांची नवीन शासकीय हमी द्यावी लागत असणे, जो थेट शासकीय निधीचा अपव्यय असणे, शासन यंत्रणेने थकबाकी वसुलीसाठी ठोस धोरण राबवून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ या महामंडळांना आर्थिक अडचणीतुन बाहेर काढणे आवश्यक असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईत इमारतीच्या ३४ मजल्यापेक्षा जास्त उंचीवरील आग विझविण्याइतपत मुंबई अग्निशमन दलाची क्षमता नसतानाही १०० ते १२५ मजल्यांपर्यंत गगनचुंबी इमारतींचे प्रस्ताव मंजूर करून सर्वत्र इमारती निर्माण करण्यात येत असणे, अग्निशमन दलाने स्वतःच आपली मर्यादा यापूर्वी मान्य केलेली असतानाही या इमारतींना बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अग्निशमन दलाची परवानगी देण्यात येत असल्याने प्रशासनात समन्वयाचा अभाव असणे, उक्त इमारतींमुळे एखादी आगीची घटना घडल्यास अग्निशमन दलाला अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असणे, त्यामुळे मुंबईतील ३४ मजल्यांच्या वरील मजल्यांवर वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना अग्नी सुरक्षा व इतर आपत्कालीन सुरक्षेपासून वंचित रहावे लागत असणे, त्यामुळे ३४ मजल्यांवरील सर्व इमारतींचे परवाने सार्वजनिक करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १० मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.